

# चर्चगेट ते हुतात्मा चौक बोगदा तयार

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो-३ भुयारी मार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या चर्चगेट ते हुतात्मा चौक येथील मेट्रो स्थानकादरम्यान असलेला बोगदा शुक्रवारी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. मेट्रो-३च्या मार्गातील हे ३३ वे भुयारीकरण आहे. मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८८ टक्के भुयारीकरण व ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.

चर्चगेट ते हुतात्मा चौक स्थानकांतील अंतर ६५३ मीटरचे आहे. भुयारीकरणादरम्यान एकूण ५०२ रिंग्जचा वापर केला गेला. अवघ्या २७५ दिवसांत डाऊन लाइन मार्गाचे भुयारीकरण एनएटीएम बोगद्यात पूर्ण करण्यात आले. एनएटीएम बोगद्यात पूर्ण होणारे हे मेट्रो-३चे पहिलेच भुयारीकरण आहे. सूर्या-२ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हा बोगदा खणण्यात आला. दक्षिण मुंबई परिसरातील फ्लोरा फाऊंटनसह अन्य ऐतिहासिक इमारतीखालून भुयारीकरण करणे एक आव्हानात्मक काम होते. यासाठी कट ॲण्ड कव्हर आणि न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग या दोन्ही पद्धतीचा संयुक्तिक वापर करून हे अभियांत्रिकी आव्हान पूर्ण करण्यात आले. चर्चगेट आणि हुतात्मा चौक स्थानकांदरम्यान असलेली व्यापारी केंद्र याद्वारे जोडली जातील, अशी माहिती एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजीतसिंह देओल यांनी दिली. पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. आतापर्यंत हुतात्मा चौक स्थानकाचे एकूण ५३ टक्के काम पूर्ण झाले आहे. पॅकेज-१ मध्ये एकूण ८० टक्के भुयारीकरण आणि ६८ टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे.